**आणीबाणीच्या कालावधीत बंदिवास सोसाव्या लागलेल्या व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करणेबाबतची योजना.....**
**माहे सप्टेंबर, २०२६ ते नोव्हेंबर, २०२६ करीता निधी वितरण करणेबाबत......**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : बियुडी-२०२६/प्र.क्र.२२/स्वासैक-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१४/१०/२०२६.

<u>संदर्भ</u>: १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१, दि. १४/०२/२०१८
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१, दि. ०३/०७/२०१८
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१, दि. १५/११/२०१८
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१, दि. ३१/०७/२०२०
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बियूडी-१४२२ /प्र.क्र.१९७/स्वासैक -१, दि.२१/१०/२०२२
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बियूडी-२०२५/प्र.क्र.७९/स्वासैक -१, दि.२७/०६/२०२५
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बियूडी २०२५ /प्र.क्र.७९/स्वासैक-१, दि.२६/०८/२०२५
८) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक,अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९/०४/२०२६
९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बियूडी २०२६/प्र.क्र.२२/स्वासैक-१, दि. २१/०५/२०२६
१०) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बियूडी २०२६/प्र. क्र.२२/स्वासैक-१, दि. २३/०६/२०२६
११) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विमंका १८२३/प्र. क्र.१८२/स्वासैक-१, दि. १७/०९/२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या व दि.२५/०६/१९७५ ते दि.२१/०३/१९७७ या आणीबाणी कालावधीत लोकशाहीसाठी लढा देणाऱ्या तसेच मिसा व डी.आय.आर. कायद्यांतर्गत सामाजिक व

राजनैतिक कारणांसाठी कारावास भोगलेल्या व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासाठी बंदिवास/कारावासाच्या कालावधीनुसार अशा व्यक्तींना रु.२०,०००/- अथवा रु.१०,०००/- इतके तर त्यांच्या पश्चात पत्नी/पतीस निम्मे मासिक मानधन अनुज्ञेय आहे.

२. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता, मागणी क्र.ए-५, प्रधान लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, १०२ सामाजिक सुरक्षेखालील निवृत्तिवेतने, (००) (०५) सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणाऱ्या व्यक्तींना आर्थिक मदत (अनिवार्य) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२३५ सी २०५) या लेखाशीर्षाखाली रु.५५,५०,४६,०००/- (अक्षरी रुपये पंचावन्न कोटी पन्नास लक्ष सेहेचाळीस हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर आहे. सदर तरतुदीपैकी वितरणासाठी उपलब्ध झालेल्या निधीतून या योजनेतील पात्र लाभार्थींना अनुज्ञयतेनुसार (रु.२०,०००/- १०,०००/- ५०००/-) याप्रमाणे माहे सप्टेंबर, २०२६ ते नोव्हेंबर, २०२६ या तीन महिन्यांचे मानधन अदा करण्याकरीता रु.१७,२९,०५,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी एकोणतीस लक्ष पाच हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

"आणीबाणीच्या कालावधीत बंदिवास सोसाव्या लागलेल्या व्यक्तींचा सन्मान / यथोचित गौरव करणेबाबत" या योजनेतंर्गत पात्र लाभार्थींना मानधन वितरीत करण्याकरीता माहे सप्टेंबर, २०२६ ते नोव्हेंबर, २०२६ या तीन महिन्यांचे मानधन अदा करण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र "अ" मध्ये त्यांच्या जिल्हयांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.१७,२९,०५,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी एकोणतीस लक्ष पाच हजार फक्त) इतके अनुदान खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे.

(अ) योजनेंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता, संख्या व त्यांना अनुज्ञेय असलेल्या मानधनाची अचूकता तपासण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

(ब) उपलब्ध करून दिलेला निधी केवळ मंजूर प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा व कोणत्याही परिस्थितीत मंजूर तरतुदीपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता जिल्हाधिकारी व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी.

(क) सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांनी वितरीत करण्यात येत असलेल्या निधीच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

(ड) वितरीत करण्यात येत असलेला निधी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

२.	सर्व जिल्हाधिकारी यांनी वितरीत करण्यात येणाऱ्या निधीतून खर्च केलेल्या अनुदानाच्या रकमांचा ताळमेळ महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२ नागपूर यांचेकडे विहित कालावधीत करुन खर्चमेळाचा मासिक अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा.

३.	सदर निधी संबधित जिल्हाधिकारी यांना अदा करण्यासाठी सह सचिव /उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष, मंत्रालय,मुंबई ( A००१३) हे नियंत्रक अधिकारी राहतील.

४.	याप्रित्यर्थ होणारा खर्च

मागणी क्र.ए-५,

प्रधान लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण,

६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम,

१०२- सामाजिक सुरक्षेखालील निवृत्तिवेतने,

(००)(०५) सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणाऱ्या व्यक्तींना आर्थिक मदत (अनिवार्य) ०३१-सहायक अनुदाने(वेतनेतर) (२२३५ सी २०५)

या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५.	हा शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारीक.सं क्र.५८२/२०२६,व्यय ४, दि.०७/१०/२०२६ अन्वये, दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१०१४१२१३३१११०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SOMNATH MALHARI KAMBLE

Digitally signed by SOMNATH MALHARI KAMBLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=70926A2F8D325E0126B8AF77E4150FF43B291B290313716A9CE2A0E9C4D19EBE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4C960C2D5A6C5AD82098B828234EA5F2C527D7831C6836BF8F9E133E9EA7242D, cn=SOMNATH MALHARI KAMBLE
Date: 2026.10.14 12:15:16 +05'30'

**(सो.म. कांबळे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२.मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३.मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

४.मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५.मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

६.मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई-३२,

७.मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,

८.सर्व संबंधित मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

९.मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

१०. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य.

११. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२,

१२. मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (वि.चौ.अ.१) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२,

१३. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १, मुंबई / नागपूर

१४. मा. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १, मुंबई / नागपूर

१५. जिल्हाधिकारी (सर्व), महाराष्ट्र राज्य

१६. सह/उप सचिव (स्वा.सै.क.१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

१७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१८.जिल्हा कोषागार अधिकारी(सर्व), महाराष्ट्र राज्य

१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२०. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन - २५, मंत्रालय, मुंबई

२१. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, (अर्थसंकल्प १४/ व्यय-४) मंत्रालय, मुंबई

२२. निवडनस्ती ( स्वा.सै.क.१)

विवरणपत्र "अ"

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | मानधन मिळण्यासाठी पात्र लाभार्थीची संख्या | माहे सप्टेंबर, २०२६ ते नोव्हेंबर, २०२६ करिता वितरीत करण्यात येत असलेला निधी (रक्कम रुपये) |
|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ४१ | २१,३०,०००/- |
| २ | मुंबई उपनगर | १२८ | ६३,३०,०००/- |
| ३ | ठाणे | १३५ | ५४,१५,०००/- |
| ४ | पालघर | ११२ | ४३,८०,०००/- |
| ५ | रायगड | ४७ | २१,९०,०००/- |
| ६ | रत्नागिरी | ८१ | ४०,२०,०००/- |
| ७ | सिंधुदुर्ग | ४६ | २२,८०,०००/- |
| ८ | नाशिक | ७७ | ३१,३५,०००/- |
| ९ | जळगाव | १७० | ७६,२०,०००/- |
| १० | धुळे | ३३ | १४,२५,०००/- |
| ११ | नंदुरबार | २८ | ११,१०,०००/- |
| १२ | अहिल्यानगर | १३१ | ५०,८५,०००/- |
| १३ | पुणे | ५४१ | २,६६,८५,०००/- |
| १४ | सातारा | ६० | १८,००,०००/- |
| १५ | सांगली | ८० | ३४,२०,०००/- |
| १६ | सोलापूर | ६३ | २५,५०,०००/- |
| १७ | कोल्हापूर | ९५ | ३३,६०,०००/- |
| १८ | छत्रपती संभाजीनगर | १४३ | ५४,१५,०००/- |
| १९ | जालना | ६७ | १९,९५,०००/- |
| २० | बीड | ५६ | ३०,००,०००/- |
| २१ | नांदेड | १०१ | ४३,०५,०००/- |
| २२ | हिंगोली | १४५ | ६२,४०,०००/- |
| २३ | परभणी | ३२ | १६,३५,०००/- |
| २४ | लातूर | १०४ | ४५,९०,०००/- |
| २५ | धाराशिव | २६ | १०,२०,०००/- |
| २६ | अमरावती | ८२ | ३६,४५,०००/- |
| २७ | बुलढाणा | ५५० | १,८७,६५,०००/- |
| २८ | यवतमाळ | ६६ | २८,०५,०००/- |
| २९ | अकोला | ८६ | ४१,४०,०००/- |
| ३० | वाशिम | १० | ४,८०,०००/- |
| ३१ | नागपूर | ३९९ | २,०३,२५,०००/- |
| ३२ | वर्धा | ११० | ५३,१०,०००/- |
| ३३ | भंडारा | २४ | १०,८०,०००/- |
| ३४ | गोंदिया | २१ | ८,५५,०००/- |
| ३५ | चंद्रपूर | ९९ | ४३,६५,०००/- |
| | **एकुण** | **३९८९** | **१७,२९,०५,०००/-** |